# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन विभाग

Email Id: swm@aurangabadmahapalika.org Helpline.No.8055505002/8055128080/155304


जाक्र/मनपा/घकव्यवि/2024/ दिनांक: / /2024

## जाहिर आवाहन

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील सर्व पानटपरी चालकांना आवाहन करण्यात येते की, छत्रपती संभाजीनगर शहर हे स्वच्छ सुंदर व हरित करण्यासाठी महानगरपालिका कटिबध्द आहे. याचाच एक भाग म्हणुन महानगरपालिकेच्या प्रयत्नांना नागरिकांची साथ मिळणे नितांत आवश्यक आहे.

शहरातील स्वच्छतेबाबत आढावा घेतला असता असे निदर्शनास आले आहे की, शहरातील रस्ते, चौक, मैदाने, उद्याने , मोकळया जागा आदी ठिकाणी गुटखा, पान मसाला, सुपारी, तंबाखु, सिगारेट यांची रिकामी पाकिटे अस्ताव्यस्त पडलेली आढळतात. त्यामुळे मोठया प्रमाणात अस्वच्छता निर्माण होते हे प्रमाण कमी करण्यासाठी प्रत्येक पानटपरी चालकाने दुकानाच्या जवळ कचराकुंडी (Dust Bin) व थुंकीपात्र ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरुन परिसरात पसरणारा प्लास्टिक कचरा नियंत्रित करता येईल. अशा प्रकारच्या कचराकुंडी (Dust Bin) व थुंकीपात्र ठेवणे बंधनकारक करण्यात येत आहे. डस्टबिन मध्ये जमा झालेला कचरा वर्गीकृत करुन महानगरपालिकेच्या घंटागाडीतच टाकावा.

करिता या पुढे शहरातील प्रत्येक पानटपरी धारकाने एक कचराकुंडी व थुंकीपात्र पानटपरी जवळ ठेवावे, अन्यथा दंडात्मक कारवाई करण्यात येईल. दंडाची आकारणी करताना प्रथम तपासणीत रुपये एक हजार, व्दितीय तपासणीत दोन हजार व तृतीय तपासणीमध्ये रुपये तीन हजार दंड वसुल करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(जी.श्रीकांत) भा.प्र.से

आयुक्त तथा प्रशासक

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका